# शैक्षणिक ग्रामसभा...

## सर्वांगीण शालेय विकासासाठी!



स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण करणे व लोकांना विकास प्रक्रियेत सहभागी करून घेणे या उद्देशाने ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद ही त्रिस्तरीय रचना अस्तित्वात आली. ग्रामपंचायत ही गावपातळीवर काम करणारी पंचायत राज व्यवस्थेमधील पायाभूत संस्था आहे. स्थानिक गरजा व उपलब्ध साधन सामुग्रीच्या आधारे विकास घडविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर आहे.

ग्रामसभा हा पंचायत राज व्यवस्थेचा कणा आहे. गावातील प्रत्येक मतदार (१८ वर्षावरील सर्व व्यक्ती) त्या गावच्या ग्रामसभेची सदस्य असते व त्यांना ग्रामसभेला उपस्थित राहण्याचा, आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. ग्रामपंचायतीने महत्वाचे निर्णय घेतांना ग्रामसभेद्वारे लोकसहभाग मिळविणे अपेक्षित आहे.

### ग्रामपंचायतीची शिक्षणातील भूमिका:

सन २००९ च्या ‘शिक्षण हक्क कायद्याने’ भारतातील चौदा वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क मान्य केला आहे. या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जशी प्रशासनाची आहे तशीच ती पंचायत राज व्यवस्थेची पण आहे. गावपातळीवर ही जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे.





## 'शैक्षणिक ग्रामसभा' – प्रक्रिया

कायद्याने शिक्षणाची हमी दिलेली असली तरी प्रत्यक्षात आजही शाळेत जाण्याच्या वयाची कित्येक मुलेमुली, विविध कारणांमुळे शाळेच्या बाहेर आहेत. विशेषकरून मुली, गरीब कुटुंबातील मुले, स्थलांतरीत बालके आणि विशेष गरजा असणाऱ्या मुलांना प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षण मिळण्याच्या आणि ते पूर्ण करण्याच्या बाबतीत अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. ग्रामपंचायत व पालक यांनी यासाठी शिक्षण यंत्रणेसोबत एकत्रित उपाययोजना करणे गरजेचे आहे.

## ग्रामपंचायतीची शिक्षणासाठी भूमिका ही खालील गोष्टींना अनुसरून असायला हवी:

### १. पूर्व शालेय शिक्षण:

गावातील ० ते ६ वयोगटातील सर्व मुले अंगणवाडीत दाखल झाली आहेत का, याची शहानिशा करणे व या वयोगटातील सर्व मुलांना पूर्व शालेय शिक्षण, लसीकरण, पोषण व आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे. अंगणवाडीमध्ये सर्व मुलांना शाळेची पूर्वतयारी म्हणून आवश्यक बाबी शिकता येतील, असे वातावरण निर्माण करण्याची आणि त्याप्रमाणे सर्व सोयी उपलब्ध करण्याची जबाबदारीही ग्रामपंचायतीची आहे.



### २. सर्वांना समान संधी:

गावातील शाळेमध्ये सर्व घटकांमधील मुलांना शिक्षणाची समान संधी मिळेल, हे निश्चित करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. जात, धर्म, गरीब-श्रीमंत, विशेषत: मुली आणि विशेष गरजा असलेली बालके तसेच अडचणीच्या ठिकाणी राहणारी मुले, या सगळ्यांना शाळेत समान वागणूक मिळेल, हे पाहिले पाहिजे. एकही मूल शाळेबाहेर राहू नये, सर्व मुले कोणत्याही अडथळ्याविना शाळेत नियमित यावीत यासाठी ग्रामपंचायतीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या पाहिजेत.

### ३. शैक्षणिक वातावरण:

शाळेतील वातावरण शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलाला आवडेल असे राखले तर मूल खऱ्या अर्थाने शाळेत रमेल आणि शिकेल. मुलांना शाळेत येण्याची ओढ हवी, भीती नको. प्रत्येक मुलाचा विचार करून शाळेत सुविधा असतील अशी शाळेची रचना असली तर प्रत्येक मूल शाळेत येईल, त्याचा आत्मविश्वास वाढेल आणि ते शिकेल.

अशी व्यवस्था तयार करण्याची जबाबदारी शिक्षक, पालक आणि ग्रामपंचायतीची आहे.

## ४. शैक्षणिक निष्पत्ती:

शाळेत आलेला प्रत्येक विद्यार्थी शिकतो का? अपेक्षित मूलभूत कौशल्ये प्राप्त करतो का? आपण ठरवलेली शैक्षणिक उद्दिष्टे पूर्ण होतात का? याकडे शिक्षक आणि ग्रामपंचायत सदस्य यांनी लक्ष देणे महत्वाचे आहे.

शाळा व्यवस्थापन समिती ग्रामपंचायत आणि सदस्य यांनी प्रत्येक मूल शिक्षणाच्या / शिकण्याच्या कोणत्या टप्प्यावर आहे, त्याच्या शैक्षणिक गरजा काय आहेत आणि त्या पूर्ण मिळण्यासाठी काय करायला पाहिजे, हे समजून घेतले पाहिजे. यासाठी नियमितपणे शाळेत येऊन शिक्षकांबरोबर याचा आढावा घेतला तर मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत नक्की वाढ होऊ शकते.

## ५. संसाधनांचा योग्य वापर:

शाळेत परिपूर्ण व सर्वसमावेशक शिक्षण उपलब्ध करून देणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर वेगवेगळ्या माध्यमातून निधी जमविणे आवश्यक आहे. समाज सहभाग आणि वेगवेगळे कर याच्या माध्यमातून तसेच काही शासकीय योजनांच्या माध्यमातूनही ग्रामपंचायतीला निधी मिळतो. या निधीचा सुयोग्य वापर करून शाळा विकास आराखडा बनविणे आणि तो अंमलात आणणे ही ग्रामपंचायतीची प्राथमिक जबाबदारी आहे. याशिवाय सर्व सदस्यांनी शासकीय निधीव्यतिरिक्त इतर माध्यमातून शाळेच्या विकासासाठी निधी मिळवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

जैतादेही पॅटर्न' च्या धर्तीवर मनरेगा योजनेच्या माध्यमातून शाळांचा भौतिक विकास करणे शक्य आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांच्या भौतिक दर्जा आणि गुणवत्तेमध्ये नक्कीच वाढ होण्यास मदत होणार आहे. तसेच अशा सुंदर परिसरात शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांचा मानसिक विकास होण्यासही मदत होईल. परिणामी जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेण्याची मानसिकता पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये होण्यासाठी हातभार लागू शकेल. जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांच्या भौतिक विकासासाठी मग्रारोहयो अंतर्गत एकूण १३ प्रकारची कामे घेता येतात. (शासन परिपत्रक क्र. मग्रारो-२०२०/ प्र.क्र.७५/रोहयो-७ दिनांक:- ०१ डिसेंबर, २०२०)

## ६. भूमिका आणि जबाबदारी:

शिक्षण हा गावविकासाचा महत्वाचा घटक आहे. गावाचा शैक्षणिक विकास साधायचा असेल तर ग्राम पंचायत सदस्यांना त्यांची भूमिका आणि जबाबदारी नीट समजली





पाहिजे. सध्याची शिक्षणप्रक्रिया, शैक्षणिक धोरणे आणि योजनांबद्दल त्यांना माहिती असायला तर हवीच, पण याच्याही पलीकडे जाऊन ग्राम पंचायत सदस्यांनी गावाच्या शैक्षणिक विकासाचा विचार करायला हवा. त्यामुळे गावाच्या शैक्षणिक विकासाचे सुयोग्य नियोजन आणि अंमलबजावणी करणे सोपे होईल.

## ७. कार्ये:

शाळेचे कामकाज नियोजनानुसार आणि नियमित चालले पाहिजे. नियमित पालक सभा, शाळा व्यवस्थापन समिती बैठका आणि ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठकांच्या माध्यमातून शैक्षणिक नियोजन व आढावा नियमित होणे गरजेचे आहे. या बैठकांमध्ये झालेल्या निर्णयांची नीट अंमलबजावणी होते आहे की नाही याची शहानिशा करण्याची जबाबदारीही ग्रामपंचायतीची आहे.

'शैक्षणिक ग्रामसभा', सर्वांगीण शालेय विकासासाठी! या सर्वसमावेशक प्रकियेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरीय, तालुका स्तरीय आणि गाव स्तरीय यंत्रणेचा सहभाग आणि जबाबदारी महत्त्वाची आहे.

### शासन निर्णय क्रमांक:

आरटीई-१११४/प्र.क्र.११९/एस एम- १
दिनांक: २० ऑगस्ट, २०१४

gyan prakash FOUNDATION

ग्यानप्रकाश फाउंडेशन

३०२, 'ऑर्चर्ड'डॉ.पै.मार्ग, बाणेर, पुणे-४५
इमेल-admin@gyanprakash.org

